# A Geographical Study of settlement pattern in Beed District.

1. Amol Zumbar Kachare. Dept. of Geography, Govt. Arts and Science College Aurangabad.
2. Dr. B.P. Lahane , Research Guide, Dept. of Geography, Govt. Arts and Science College Aurangabad.

**गोषवारा –**

मानवाने आपल्या निवाऱ्याकरता केलेल्या घरांच्या समूहाची मांडणी याला वसाहत असे म्हणतात. डिकीसन्स यांच्या मते शेतवाड्या, गृहसमूह, नगरे इ. मानवी समाजाला आवश्यक असलेल्या सामाजिक, भौगोलिक, घटकांची क्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वस्ती होय. वस्त्या निर्माण होताना स्थान हा घटक खूप महत्वपूर्ण असलेलेला दिसून येतो. स्थान अनुकूल असल्यास वस्तीची उत्क्रांती होऊ लागते. कालानुरूप काही घडामोडीमुळे वस्त्या नष्ट होतात तर काही नवीन वस्त्या निर्माण होतात. उदा. भूकंप, ज्वालामुखी धरणाची निर्मिती इ. कारणाने गावांचे स्थलांतर होताना दिसून येते. म्हणजेच ग्रामीण वस्तीच्या संखेत वाढ किंवा घट होताना दिसून येते. बीड जिल्हयातील जनगणना वर्ष २०११ या दशकात ग्रामीण वस्त्यांच्या संख्येत बदल कसा घडून आला. या बदलास अनुसरून ग्रामीण वस्त्यांच्या लोकसंख्याची सरासरी मध्ये मध्ये दशकानुसार कसा बदल झाला. मंडळानूसार लोकसंख्या टक्केवारीत झालेला बदल धनात्मक आहे की ऋणात्मक . जसजसी लोकसंख्या वाढत गेली तसतसे ग्रामीण वस्त्यांची संख्या वाढत गेली त्याचप्रमाणे ग्रामीण वस्त्यांचा आकार कशा पद्धतीने वाढत गेला हे पाहणे.

## प्रस्तावना --

मानवाच्या गरजांची पूर्ती करणे हा वस्त्यांचा मुख्य हेतू असतो हेतूच्या अनुषंगाने ग्रामीण वस्त्या विविध प्रकारची आर्थिक कार्य करतात सांस्कृतिक कार्य करतात जंगलातील वस्त्या वन्य जन्य पदार्थाचे संकलन करतात तर नगराजवळील वस्त्या छोटे उद्योग अथवा निवासी वस्त्या म्हणून कार्य करतात व त्यांचे कार्य हे स्थानावर अवलंबून असते वस्त्यांचा विकास व विस्तार वस्तीच्या कार्यावर व स्थानावर अवलंबून असतो

कोणत्याही प्रदेशातील ग्रामीण वस्त्या ह्या पर्यावरणाची समायोजन करण्याच्या या प्रक्रियेतून निर्माण होतात. ग्रामीण वस्तीची निर्मिती स्वयम् प्रेरणेतून झालेली असते. ग्रामीण वस्तीचा विकास झाल्यामुळे आकारमान लोकसंख्या या घटकात वाढ होते ग्रामीण वस्ती सभोवतालच्या परीसरांच्या संदर्भात निर्माण झाली कार्य करतात आणि तीच ग्रामीण वस्ती नागरी वस्तीत रूपांतरित होते

कोणत्याही प्रदेशातील लोकवस्तीची श्रेणी व त्यांचा आकार ठरविण्याचा एकमेव आधार घटक म्हणजे त्या त्या वस्तूंची लोकसंख्या होय कारण वस्तीचा विस्तार लोकसंख्येशी निगडीत असतो कोणत्याही वस्तीची लोकसंख्या वाढली कि तीचा विस्तार वाढतो आणि सेवाकार्य ही वाढते याचा अर्थ असा की लोकसंख्या व वस्तीची श्रेणी यांचा सहसंबंध आहे म्हणूनच लोकसंख्या या घटकाचा ग्रामीण वस्ती ची श्रेणी ठरविण्यासाठी उपयोग केला जातो.

## अभ्यास क्षेत्र –

बीड जिल्हा औरंगाबाद विभागाच्या पश्चिमेस मध्यभागी वसलेला असून त्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° २८’ ते २९° २८’ उत्तर अक्षांश आणि ७४° ५४’ ते ७६° ५७’ पूर्व रेखांशावरविस्तारलेला आहे

जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०६५४ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या ३.४५% एवढे आहे सन २०११च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ही २५.८५ लक्ष इतकी होती .

## उद्दिष्टे

१) लोकसंख्याचा आकार यास अनुसरून ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास □□□□.

२) ग्रामीण वस्ती यांतील लोकसंख्येत काळानुरूप बदल होत असतो अभ्यासणे

## गृहितके

१) बीड जिल्ह्यातील ग्रामीण वस्ती व प्रारूपे त्यांचा अभ्यास करणे

२) बीड जिल्ह्यातील लोकसंख्येच्या आकारानुसार वस्तीमध्ये कसा बदल होत गेला हे अभ्यासणे

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर आधारलेला आहे यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ नियतकालिके मासिके शासकीय प्रकाशने इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

## विश्लेषण

प्रस्तुत १ .१ तक्त्याच्या सहाय्याने बीड जिल्ह्यातील एकूण १३५७ गावे आहेत एकूण तालुक्यांपैकी वडवणी (४५) या तालुक्यात सर्वात कमी गावांची संख्या आढळते बीड तालुक्यात सर्वात जास्त (१९३) गावांची संख्या आढळते शिरूर कासार, वडवणी, धारूर या तालुक्यात (१००) पेक्षा कमी गावांची संख्या आढळते आष्टी ,पाटोदा, गेवराई, माजलगाव, केज ,परळी, अंबाजोगाई, बीड या तालुक्यात (१००) पेक्षा जास्त गावांची संख्या आढळते मोठ्या वस्त्यांचे शहर व प्रमुख शहर जिल्ह्यातील बीड आढळते जिल्ह्याचे मुख्यालय व जास्त लोकसंख्येचे शहर बीड आहे की जे जिल्ह्याची सर्व प्रकारच्या सेवा पुरविते सर्वात जास्त मोठ्या वस्तीचे गाव बीड गेवराई, आष्टी, अंबाजोगाई (१६) या तालुक्यात आढळतात माजलगाव, परळी, धारूर, केज, पाटोदा या तालुक्यात प्रत्येकी एक मोठ्या वस्तीचे शहर आढळतात.

**तक्ता क्र.१.१ बीड जिल्हा : गावे व लोकसंख्या आकार गट (२०११ जनगणना)**

| तालुके | गावांची संख्या | शहरांची संख्या | कुटुंबाची संख्या | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| आष्टी | १७६ | ०१ | ५०५७४ | २३१६३५ |
| पाटोदा | १०५ | ० | २५६१२ | १२५०८१ |
| शिरूर कासार | ९४ | ० | २६६४२ | १२८५८३ |
| गेवराई | १९३ | १ | ६२०३३ | ३०५०४८ |
| माजलगाव | १२१ | १ | ४४१३४ | २०५७२८ |
| वडवणी | ४५ | ० | १८३३९ | ८७६८५ |
| बीड | २२४ | १ | ५९१९१ | २७७९५५ |
| केज | १२१ | १ | ४६५०७ | २१३१२८ |
| धारूर | ६७ | १ | २१३१५ | १०१६९३ |
| परळी | १०५ | १ | ४०४२४ | १९६२३३ |
| अंबाजोगाई | १०६ | १ | ४०८१७ | १९७९८२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकून | १३५७ | ८ | ४३५५८८ | २०७०७५१ |

□□□□□□□: D.S.A. BEED (2011) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन बीड.

तक्ता क्रमांक १ .२ विश्लेषण अनुसार वस्त्यांच्या आकृतिबंध यांचा लोकसंख्येच्या श्रेणी आकारानुसार १४० गावांची लोकसंख्या ही ५०० पेक्षा कमी आहे यामध्ये आष्टी आणि बीड या तालुक्यात संख्या जास्त आहे (२५) काही तालुक्यातील वस्त्या अशा आढळून आल्या की त्या एकाकी वस्त्या होत्या यामध्ये पाटोदा धारूळ धारूड परळी इत्यादी तालुक्याचा समावेश आहे मध्यम लोकसंख्येच्या आकाराचे ५०० ते २००० मध्ये ८८९ गावांची संख्या असून ही सर्वात जास्त आहे ,सर्वात जास्त गावाची संख्या बीड २२४ गेवराई तालुक्यात १९६ गावे आढळते तर सर्वात कमी गावाची संख्या वडवणी तालुक्यात आढळते २००० ते ५०००या लोकसंख्येच्या आकारात २२५ वस्त्यांची संख्या आढळते यामध्ये केज २७ माजलगाव ३० गेवराई ३७ आष्टी २८ या तालुक्यात सर्वात जास्त गावे आढळतात सर पाटोदा व शिरूर कासार यामध्ये या करायची गावे कमी आढळतात 5000 ते 10000 21 बीड चार माजलगाव चार गेवराई तीन.

**तक्ता क्र.१ .२ बीड जिल्हा : वस्ती आकृतिबंध (२०११ जनगणना)**

| तालुके | गावांची संख्या | ५०० पेक्षा कमी | ५०० ते २००० | २००० ते ५००० | ५००० ते १०००० | १०००० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|
| आष्टी | १७६ | २५ | १०९ | २८ | ०१ | ०१ |
| पाटोदा | १०५ | ३२ | ५० | १३ | ०० | ०१ |
| शिरूर कासार | ९४ | ०९ | ६५ | १७ | ०१ | ०० |
| गेवराई | १९३ | १२ | १३२ | ३७ | ०३ | ०१ |
| माजलगाव | १२१ | ११ | ७० | ३० | ०४ | ०१ |
| वडवणी | ४५ | ०७ | १८ | १४ | ०० | ०१ |
| बीड | २२४ | २५ | १६८ | २१ | ०४ | ०१ |
| केज | १२१ | ०४ | १०० | २७ | ०३ | ०० |
| धारूर | ६७ | ०३ | ४६ | १५ | ०१ | ०० |
| परळी | १०५ | ०६ | ६३ | २७ | ०१ | ०१ |
| अंबाजोगाई | १०६ | ०६ | ६८ | २६ | ०३ | ०० |
| एकून | १३५७ | १४० | ८८९ | २५५ | २१ | ०७ |

□□□□□□□: D.S.A. BEED (2011) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन बीड.

## संदर्भ –

1. Savant S.B. (1979) “Trends of Rural Transformation In Pune District” Deccan geographer Vol. XCIII
2. Rajendra Prasad “Population Geography of India” Concept Publication Company New Delhi.
3. डॉ. श्रीकांत कार्लेकर , डॉ. मोहन काळे “भूगोलशास्त्रीय संशोधन पद्धती” डायमंड पब्लिकेशन्स पुणे
4. डॉ. एस. डी. मौर्य “ अधिवास भूगोल” शारदा पुस्तक भवन इलाहाबाद
5. R.Y. Singh “ Geography of Settlements”
6. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन बीड.